दिनांक :     .०१.२०१९

प्रति,

माननीय पंतप्रधान,
भारत सरकार, १५२ बी, साऊथ ब्लॉक,
रायसिना हिल, नवी देहली - ११००११

**विषय : सुसंस्कारीत भावी पिढी घडवण्यासाठी**
**शाळा-महाविद्यालयांमधून हिंदु विद्यार्थ्यांना हिंदु धर्माचे शिक्षण मिळण्याविषयी...**

महोदय,

भारतवर्षाचा इतिहास पाहिला, तर आपल्याकडे वेद, उपनिषदे, श्रृती, स्मृती, पुराण आदी अनेक धर्मग्रंथ हे हिंदु धर्माचे तत्त्वज्ञान सांगणारे आहेत. इतक्या मोठ्या प्रमाणात आणि विविधांगी विषयांवर धर्माचे तत्त्वज्ञान जगातील अन्य कोणत्याही पंथीयांच्या धर्मग्रंथांत नाही. किंबहुना अन्य पंथीयांचे फारतर एक-दोन धर्मग्रंथ मान्यताप्राप्त आहे. हिंदु धर्मातील तत्त्वज्ञानाची व्याप्ती इतकी मोठी आहे की, ती एखाद्या ग्रंथात सामावली जाणे, हे शक्यच नाही. हीच तर आपली महानता आहे. आज हेच ग्रंथ विश्वकल्याण आणि विश्वशांती यांसाठी खर्‍या अर्थाने मार्गदर्शक असल्याचे जगन्मान्य आहे. त्यामुळे जगभरातील विविध विद्यापिठे आणि शाळा यांमध्ये या महान ग्रंथांचा अभ्यास करून जीवन सुसंस्कारीत, सुखी आणि आनंदी होण्यासाठी साहाय्य होत आहे. सध्या समाजामध्ये निर्माण झालेल्या विविध प्रकाराच्या समस्यांपासून खर्‍या अर्थाने जगाला तारू शकते, असे ज्ञान या धर्मग्रंथात असल्याचे अनेक विद्वान शास्त्रज्ञांनी सांगितले आहे; मात्र असे असले, तरी भारतात बहुसंख्येने असलेल्या हिंदू विद्यार्थ्यांना शाळा-महाविद्यालयांतून हिंदूंच्या धर्मग्रंथांची शिकवण कुठेच दिली जात नाही.

*** यासंदर्भात काही सूत्रे आपल्या निदर्शनास आणून देत आहोत -**

१. भारत हा धर्मनिरपेक्ष देश आहे; तरी देखील मदरशांमध्ये कुराण शिकवले जाते, ख्रिस्ती मिशनरींच्या कॉन्व्हेट शाळांत बायबल शिकवले जाते आणि धर्मनिरपेक्षतेच्या नावाखाली हिंदु विद्यार्थी ज्या शाळांत शिकतात, तेथे धार्मिक शिक्षणाला अटकाव केला जातो.

२. अनेक अल्पसंख्यांकांच्या शाळांसाठी शासकीय अनुदान मिळते. धर्मनिरपेक्ष तत्त्वावर चालणारे शासन धर्माधारित शिक्षण संस्थांना अनुदान देते. हिंदु धर्मीयांना अनुदान तर सोडाच, धर्मशिक्षण देण्यासही सुविधा दिली जात नाही.

३. हिंदूंच्या धर्मग्रंथांत असलेले ज्ञान हे केवळ हिंदूपुरते मर्यादित नसून ते सर्व जाती-धर्माच्या लोकांना वैयक्तिक आणि सामाजिक या दोन्ही स्तरावर सर्वांगीण विकास साधून देणारे आहे. त्यामुळेच अमेरिकेसारख्या अत्यंत प्रगत आणि विकासित देशातील बिझनेस मॅनेजमेंटच्या विद्यार्थ्यांना भगवद्गीतेचा विषय सक्तीचा करण्यात आला आहे.

४. मध्यप्रदेशमधील शाळांमध्येही शासनाने 'भगवद्गीता' हा विषय शिकवण्याचा निर्णय घेतला आहे. या संदर्भात मध्यप्रदेशाच्या उच्च न्यायालयाने 'भगवद्गीता' हा केवळ धर्मग्रंथ नसून जीवन जगण्याचे उत्तम तत्त्वज्ञान आहे. त्यामुळे ती शिकवण्यास हरकत नाही, असे सांगत तो शिकवण्यास अनुमती दिली आहे.

५. जम्मू-काश्मीर प्रशासनाने २२ ऑक्टोबर २०१४ या दिवशी शाळा, महाविद्यालये आणि राज्यातील वाचनालये येथे 'रामायण' आणि 'भगवद्गीता' यांच्या उर्दू प्रतींचे वितरण करण्याचा आदेश दिला आहे.

६. महाराष्ट्रात ताणतणाव नियंत्रणासाठी शाळांमधून बौद्ध धर्मातील 'विपश्यना' शिकवली जात आहे.

७. 'भगवद्गीता' आणि हिंदु धर्माचे अन्य धर्मग्रंथ यांमध्ये दिलेले ज्ञान मनुष्याला शाश्वत चैतन्य प्राप्त करून देणारे आणि संजीवनीसमच आहे. कर्मयोग, भक्तीयोग, ज्ञानयोग आदी योगमार्गांचा अवलंब करून आदर्श अन् समृद्ध जीवन जगून जीवनाचे सार्थक कसे करायचे, याची शिकवण 'भगवद्गीता' देते. भगवद्गीतेचे बाळकडू प्यायल्याने भावी पिढी, समाज इतकेच नव्हे, तर प्रशासनही आदर्श बनेल.

८. भगवद्गीतेचे तत्त्वज्ञान सकल मानवजातीच्या उद्धाराचे असून त्याचे मोल आज विश्वातील अनेक देशांना ज्ञात

झाले आहे; म्हणूनच काही शाळा आणि महाविद्यालये यांत भगवद्गीतेचे तत्त्वज्ञान (विनाविरोध स्वीकारून) शिकवण्यास मान्यता दिली जाते. अन्य धर्मीय असूनही त्यांचा 'भगवद्गीता' शिकण्याचा प्रयत्न स्तुत्य आहे.

९. मानवी जीवन समृद्ध करणाऱ्या भारतियांच्या या महान ग्रंथाचे मोल जाणून देश-विदेशातील बुद्धीवंत, विचारवंत आणि अभ्यासक तिचा अभ्यास करून मानवी जीवन समृद्ध करत आहेत. याची काही उदाहरणे येथे देत आहे.

अ. अमेरिकेतील 'सेटॉन हॉल युनिव्हर्सिटी'मध्ये शिकण्यास येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला श्रीमद् भगवद्गीता शिकणे अनिवार्य केले आहे.

आ. अमेरिकेतील हॉवर्ड विद्यापीठात संस्कृत भाषा शिकवली जाते, कारण अनेक धर्मग्रंथांचे अध्ययन करण्यासाठी संस्कृत भाषा येणे आवश्यक आहे. तेथे मॅनेजमेंट या विषयासाठी श्रीमद् भगवद्गीतेचा विशेष अभ्यास केला जातो.

इ. संस्कृत भाषेतील धर्मग्रंथांतील तत्त्वज्ञानाचा अभ्यास करण्यासाठी जर्मनीतील १४ प्रमुख विद्यापीठांमध्ये संस्कृत भाषा शिकवली जाते.

ई. 'द साऊथ एशिया इंस्टिट्युट' आणि 'युनिव्हर्सिटी ऑफ हेडलबर्ग' यांच्या माध्यमातून स्वित्झर्लंड आणि इटली येथे तत्त्वज्ञानाचा अभ्यास करण्यासाठी संस्कृत शिकवले जाते.

उ. नेदरलँड येथील शाळांमध्ये ५ वीच्या मुलांना भगवद्गीता शिकवली जाते.

अशी आणखी अनेक उदाहरणे मिळतील.

१०. स्वातंत्र्यानंतर ७० वर्षांत बहुसंख्य हिंदूंच्या देशातच हिंदूंना धर्मशिक्षणाची कोणतीही व्यवस्था करण्यात आली नाही. त्यामुळे आज हिंदु युवापिढी पाश्चात्त्य संस्कृतीच्या प्रभावामुळे चंगळवाद, व्यसनाधीनता, नीतीहीनता आणि वासनांधता यांच्या आहारी जाऊन वाममार्गाला लागली आहे. धर्मशिक्षणातून नीतीमत्ता येते, सध्या ते मिळतच नसल्याने समाजात चोऱ्या, खून, दरोडे, बलात्कार आणि भ्रष्टाचार आदींसारखे गुन्हे वाढले आहेत. यामागेही धर्मशिक्षणाचा अभाव हेच मुख्य कारण आहे.

११. याचसमवेत 'सिगना टीटीके हेल्थ इश्युरन्स'ने केलेल्या सर्वेक्षणात असे आढळले आहे की, देशातील ८ भारतियांपैकी एकाला तणावाशी सामना करणे अशक्य जाते. यावरून देशातील युवक आणि नागरिक यांची ताणतणावाची स्थिती स्पष्ट होते. केवळ ताणतणाव नव्हे, तर वैयक्तिक आणि सामाजिक जीवन सुखी होण्यासाठी, लहान मुलांवर सुसंस्कार घडवण्यासाठी रामायण, महाभारत आदी धर्मग्रंथांचे शिक्षण देणे अत्यंत आवश्यक आहे.

हिंदूंना त्यांच्या धर्मग्रंथांचे शिक्षण शाळेतून दिल्यास देशातील भावी पिढी ही सुजाण, संस्कारक्षम आणि चारित्र्यसंपन्न अशी निर्माण होईल. हाच खऱ्या अर्थाने मानवाचा विकास आहे. तरी केंद्रशासनाने हिंदूंना त्यांच्या धर्मग्रंथांचे शिक्षण शाळेतून देण्याचा निर्णय घ्यावा आणि सर्व शाळा-महाविद्यालयांमधून प्रतिदिन धर्मशिक्षण द्यावे, अशी आम्ही मागणी करत आहोत.

या मागणीसाठी .... या दिवशी ...... या वेळी राष्ट्रीय हिंदू आंदोलन करण्यात आले.

आपला विश्वासू,

(संपर्क : )